सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १८३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २६ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# नेपाळमध्ये आलेल्या भीषण पूरामुळे शेकडो भारतीय पर्यटक बेपत्ता

## २९१ विदेशी नागरिक बेपत्ता; १०५ भारतीयांचा समावेश, १६ जणांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६रसुवा नेपाळ**

नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला अचानक आलेल्या भीषण पुरामुळे मोठी हानी झाली आहे. या दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाला असून ४१ सुरक्षा कर्मचारी बेपत्ता असल्याची माहिती मिळत आहे. बेपत्ता कर्मचाऱ्यांमध्ये नेपाळ पोलिसांचे ३२ आणि सशस्त्र पोलिस दलाचे ९ जवान आहेत. त्याचबरोबर २९१ परदेशी नागरिक बेपत्ता झाल्याचे सांगितले जात आहे.

चीनच्या तिबेटमधून आलेल्या अचानक पुरामुळे नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात प्रचंड विध्वंस झाला आहे. भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्याने तिमुरे आणि स्याब्रुबेसी भागातील अनेक घरांचे नुकसान झाले आहे.रसुवा येथील एक जलविद्युत प्रकल्पही पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. एपी वृत्तसंस्थेनुसार, आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

पुरामुळे मोठ्या संख्येने लोक बेपत्ता आहेत. नेपाळच्या पर्यटन विभागाच्या माहितीनुसार, १०५ भारतीय नागरिकांसह २९१ परदेशी पर्यटक अद्याप बेपत्ता आहेत. तिमुरे सीमा चौकीवर तैनात असलेले नऊ पोलीस कर्मचारीही बेपत्ता असल्याचे वृत्त आहे.

बचाव पथकांनी आतापर्यंत २५ जणांना वाचवले आहे. मदत आणि बचाव कार्यासाठी चौदा हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहेत. बेपत्ता लोकांचा शोध आणि पूरग्रस्त भागात अडकलेल्या लोकांना बाहेर






काढण्याचे काम सुरू आहे.

नेपाळमधील पुराचा परिणाम आता भारतातही पोहोचण्याची शक्यता आहे. याच्या प्रतिसादात, बिहारमधील आठ जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सारण, मुझफ्फरपूर, वैशाली, सीतामढी आणि शिवहर यांचा समावेश आहे.

बिहार आपत्ती व्यवस्थापन विभागाने गंडक नदीत सुमारे ३ मीटर उंचीची अचानक पूर लाट येण्याची शक्यता व्यक्त केली आहे.स्थानिक माध्यमांनुसार, ज्यांना आपत्कालीन मदतीची आवश्यकता आहे ते १२३४, ११४४ या क्रमांकांवर किंवा ९८५१२८९४५ या क्रमांकावर पर्यटक पोलिसांशी संपर्क साधू शकतात, किंवा जवळच्या पोलीस किंवा सुरक्षा चौकी, स्थानिक प्रशासन, ट्रॅव्हल एजन्सी, गाईड किंवा टूर ऑपरेटर यांना माहिती देऊ शकतात.

### पंतप्रधान बालेन यांनी सैन्य तैनात करण्याचे आदेश दिले

नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी रसुवा येथील पूरग्रस्त भागांमध्ये बचाव आणि मदत कार्यासाठी नेपाळी सैन्य, सशस्त्र पोलीस दल आणि नेपाळ पोलिसांना तैनात करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रभावित भागांमध्ये इतर जिल्ह्यांमधूनही अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी पाठवण्यात आले आहेत.प्रभावित भागांमध्ये अतिरिक्त रुग्णवाहिका आणि वैद्यकीय कर्मचारीही पाठवले जात आहेत. बालेन यांनी नदीकाठच्या सखल भागांमध्ये राहणाऱ्या लोकांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे निर्देश दिले आहेत.

### पुरामुळे हेलिपॅड वाहून गेले, बचाव हेलिकॉप्टरला परतावे लागले

रसुवा येथील टिमुरेमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी पाठवलेले हेलिकॉप्टर न उतरताच काठमांडूला परतले. पुराच्या पाण्यात स्थानिक हेलिपॅड वाहून गेले होते, त्यामुळे वैमानिकाला उतरण्यासाठी सुरक्षित जागा मिळाली नाही.

पायलटने काठमांडू पोस्टला सांगितले की, वरून पाहिल्यावर टिमुरे गावाचा मोठा भाग दिसतच नव्हता. ते म्हणाले की, त्रिशूली नदीचे पाणी अचानक खूप वेगाने वाढले, जसे अचानक एखाद्या बंद नदीचे पाणी बाहेर आले असेल.

### बिहारमध्ये अलर्ट, एनडीआरएफ-एसडीआरएफ पथके तैनात

बिहारमध्ये आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने अलर्ट जारी केला आहे. कोसी, बागमती आणि गंडकच्या पाणलोट क्षेत्रातही (कॅचमेंट एरिया) पाळत वाढवण्यात आली आहे. मुख्य सचिव प्रत्यय अमृत यांनी अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. एनडीआरएफ आणि एसडीआरएफची अतिरिक्त पथके तैनात केली जात आहेत.गोपालगंजमध्ये छऊठऋ टीम पाठवली जाईल, मुजफ्फरपूरमध्ये टीम स्टँडबाय राहील आणि बेतियामध्ये सुमारे २ तासांत टीम तैनात केली जाईल. गरज पडल्यास बोट, निवारा आणि सामुदायिक स्वयंपाकघराची व्यवस्थाही केली जाईल.

# ते तर गुडघ्याला बाशिंग बांधलेले भावी मुख्यमंत्री

## अमरावती रुग्णालय दुर्घटनेवरून सुषमा अंधारेंची पालकमंत्री बावनकुळेंवर सडकून टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू ही घटना अत्यंत वेदनादायी आहे. अशाच प्रकारची घटना भंडारा येथे घडली होती, त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे लगेच त्या ठिकाणी पोहचले होते. त्या प्रकरणात तीन अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले होते. पण, येथे मुख्यमंत्री सोडाच, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अजूनही फिरकलेले नाहीत, ते इतर पक्षांमध्ये तोडफोड करण्यात व्यस्त असावेत, अशी टीका शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या आणि प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी येथे केली.



सुषमा अंधारे यांच्यासह शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख, गजानन लवटे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांची भेट घेतली. यावेळी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सुषमा अंधारे यांनी सरकारवर टीका केली. अंधारे म्हणाल्या, चंद्रशेखर बावनकुळे यांना मुख्यमंत्रीपदाचे डोहाळे लागले आहेत. गुडघ्याला बाशिंग बांधून असलेले भावी मुख्यमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अजूनही अमरावतीत पोहचलेले नाहीत. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आरोग्य विभागासाठी पुरेशी तरतूद करणे, आलेले प्रस्ताव मान्य करणे, हे अपेक्षित आहे, पण हे काम सोडून ते इतर पक्ष फोडण्यात गुंतलेले आहेत.

जिल्हा स्त्री रुग्णालयाचे फायर ऑडिट झालेले नव्हते, हे स्पष्ट झाले आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांनी वेळोवेळी पत्र आणि स्मरणपत्र देऊनही या कामात दिरंगाई झाली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपले काम व्यवस्थितपणे केले नाही. नवजात शिशू अतिदक्षता विभाग सुरक्षित नाही, दुर्घटना होऊ शकते, हे ठाऊक असतानाही बाळांना त्या ठिकाणी ठेवण्यात आले. हा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे संबंधितांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल का करण्यात येऊ नये, अजूनही या प्रकरणात एफआयआर झालेला नाही, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

### चौकशी समितीचे काम काय?

या प्रकरणात सरकारने चौकशी समिती स्थापन केली आहे. ही समिती अमरावतीत पोहचली असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आम्ही ही समिती कुठे आहे, याची चौकशी करीत आहोत. अजूनही समिती आम्हाला आढळून आलेली नाही. या दुर्घटनेसाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. त्याविषयीची कागदपत्रे आम्ही मागितली आहेत, ती मिळालेली नाहीत, असेही अंधारे यांनी सांगितले.

# नेपाळमध्ये अडकलेल्या अमरावती जिल्ह्यातील पर्यटकांनी जिल्हा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांच्याशी संपर्क साधावा

## - जिल्हाधिकारी अमरावती यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती** नेपाळ मधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर विविध देशांतील पर्यटक व नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे.या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असून पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही,* त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधता येईल **:जिल्हा नियंत्रण कक्ष, अमरावती ०७२१-२६६२०२५ १०७७ (टोल फ्री)** नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांची माहिती प्रशासनाला देताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण/हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक उपलब्ध असल्यास तो द्यावा.अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माहितीसाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. आपत्तीग्रस्त भागातील नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती माहिती व समन्वय साधण्याचे प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहेत



# बालकांच्या मृत्यूला आरोग्यमंत्री जबाबदार, सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा- कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत तीन निष्पाप नवजात बालकांचा मृत्यू झाला. या घटनेची आज कॉंग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी रुग्णालयात प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. रुग्णालयातील सुरक्षाव्यवस्थेतील गंभीर त्रुटी, कालबाह्य फायर सेफ्टी ऑडिट यामुळे सरकारच्या आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. तसेच, अमरावतीत नवजात बालकांच्या मृत्यूला आरोग्यमंत्री आणि संबंधित अधिकारी जबाबदार असून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी विजय वडेट्टीवार म्हणाले.

या दुर्घटनेपूर्वीच अग्निशमन विभागाने फायर सेफ्टी ऑडिटच्या नूतनीकरणाबाबत रुग्णालय प्रशासनाला सूचना केल्याची माहिती आहे. तरीही त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. आरोग्यमंत्री केवळ चौकशीची घोषणा करून आपली जबाबदारी झटकू शकत नाहीत. या चौकशीचा अहवाल आठ दिवसांत जाहीर केलाच पाहिजे. आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग हे एकमेकांकडे बोट दाखवत आहे. या प्रकरणी आरोग्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दोषी आहेत. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

### शिल्लर कंपनीचा व्हेंटिलेटर...



रुग्णालयाची पाहणी केल्यानंतर पत्रकार परिषदेत वडेट्टीवार यांनी सरकारला जाब विचारत म्हटले, २०२२ मध्येही याच रुग्णालयात व्हेंटिलेटरशी संबंधित घटना घडली होती. त्याची चौकशी झाली. चार वर्ष त्याचा अहवाल आला नाही, कारवाई झाली नाही. २०२२मधील घटनेतही शिल्लर कंपनीचा व्हेंटिलेटर होता. सध्याच्या दुर्घटनेतही याच कंपनीच्या उपकरणांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे ही व्हेंटिलेटर या रुग्णालयातून हटवली पाहिजे. राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये या कंपनीचे मोठ्या प्रमाणावर व्हेंटिलेटर वापरात आहेत. महाराष्ट्रातील लाखो रुग्णांच्या जीविताशी संबंधित हा गंभीर प्रश्न आहे. सगळ्या रुग्णालयातूनच हे व्हेंटिलेटर हटवून नवीन व्हेंटिलेटर वापरावे याबाबत मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्र्यांकडे पत्र लिहून मागणी करणार असल्याचे कॉंग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. हे व्हेंटिलेटर चायना मेड आहेत का? कोणाच्या दबावामुळे ही उपकरणे खरेदी केली गेली? असे सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केले. २०२२ मध्ये चौकशी झाली तरी काही बदल झाला नाही. आता या घटनेनंतर आठ दिवसात आरोग्यमंत्र्यांनी या प्रकरणाचा अहवाल जाहीर केला पाहिजे. अमरावती प्रकरणाचा पाठपुरावा आम्ही अधिवेशनात करू. सरकारला जाब विचारू अस वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत म्हटले. या घटनेत मृत्यू झालेल्या बालकांच्या कुटुंबाला २५ लाखांची मदत करण्यात यावी, परिचारिकेने धाडसाने ६ बालकांचा जीव वाचवला, याची दखल घेतली पाहिजे. इतकी मोठी घटना घडल्यावर आरोग्य विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलून मोकळे होणार असतील तर हे अत्यंत गंभीर आहे, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

## संपादकीय ......

# महागाईने जनसामान्यांचे आर्थिक बजेट विस्कटले

*महागाई हा आज केवळ अर्थव्यवस्थेतील आकडा राहिलेला नाही, तर तो सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापासून घरगुती बजेटपर्यंत पोहोचलेला ज्वलंत प्रश्न बनला आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे मध्यमवर्गीय, कष्टकरी तसेच शेतकरी कुटुंबांचे आर्थिक गणित दिवसेंदिवस बिघडत चालले आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने महिन्याचे बजेट जुळविताना नागरिकांची अक्षरशः दमछाक होत आहे. महागाईची ही झळ केवळ बाजारपेठेत जाणवणारी नसून तिचे परिणाम घरातील प्रत्येक खर्चावर उमटत आहेत.किराणा माल, खाद्यतेल, डाळी, तांदूळ, साखर, दूध, भाजीपाला, भगर, शेंगदाणे आणि इतर दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढल्याने घरखर्चाचा ताळमेळ साधणे कठीण झाले आहे. पूर्वी ठराविक रकमेत महिन्याचा किराणा भागत असे; आता त्याच रकमेत कमी वस्तू खरेदी करूनही बिलाची रक्कम अधिक होत असल्याचे ग्राहकांचे अनुभव आहेत. महिन्याच्या सुरुवातीलाच मोठ्या प्रमाणात किराणा खरेदी केल्यानंतर महिनाअखेरीस अचानक उद्भवणाऱ्या खर्चांसाठी पैसे शिल्लक राहत नाहीत. परिणामी शिक्षण, आरोग्य, प्रवास, घरगुती गरजा किंवा बचत यांसारख्या बाबींवर खर्च करताना नागरिकांना कात्री लावावी लागत आहे.महागाईचा सर्वाधिक परिणाम मध्यमवर्गीय कुटुंबांवर होताना दिसतो. पगार किंवा उत्पन्न निश्चित असताना घरभाडे, वीजबिल, शिक्षणाचा खर्च, प्रवास, किराणा आणि इतर आवश्यक खर्च वाढत असल्याने बचतीला मोठा धक्का बसत आहे. भविष्यासाठी काही रक्कम बाजूला ठेवण्याऐवजी सध्याचा खर्च भागविणे महत्त्वाचे ठरत आहे. अनेक कुटुंबे आवश्यक आणि अनावश्यक खर्चाची नव्याने विभागणी करत आहेत. काही वस्तूंचे प्रमाण कमी करणे, स्वस्त पर्याय निवडणे आणि बाजारातील दरांची तुलना करून खरेदी करणे, ही परिस्थितीशी जुळवून घेण्याची नागरिकांची धडपड आहे.महागाईचा दुसरा महत्त्वाचा फटका शेतकरी वर्गाला बसत आहे. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी आणि वाहतूक यांचा खर्च सातत्याने वाढत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला अपेक्षित आणि हमीभावासारखा योग्य दर मिळाला नाही, तर शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष उत्पन्न किती उरणार, हा गंभीर प्रश्न आहे. एका बाजूला ग्राहक वाढत्या दराने वस्तू खरेदी करतो, तर दुसऱ्या बाजूला उत्पादकाला त्याच वस्तूचा पुरेसा मोबदला मिळत नाही, ही विसंगती दूर होणे गरजेचे आहे. उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतच्या साखळीत अनेक स्तर असताना त्याचा भार अंतिमतः ग्राहक आणि शेतकरी या दोघांवर पडत असेल, तर व्यवस्थेचा फेरविचार करण्याची वेळ आली आहे.महागाई वाढली की नागरिकांच्या खरेदी क्षमतेवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम थेट किरकोळ बाजारावरही होतो. ग्राहक आवश्यक वस्तूंची खरेदी करताना अधिक सावध झाले आहेत. दरांची तुलना करणे, काही वस्तू कमी प्रमाणात घेणे किंवा गरज पुढे ढकलणे, असे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे बाजारातील मागणीवर परिणाम होऊ शकतो. ग्राहकांच्या हातातील पैसा खर्च करण्याऐवजी केवळ अत्यावश्यक गरजांपुरता मर्यादित राहिला, तर त्याचे व्यापक परिणाम अर्थचक्रावर होणे स्वाभाविक आहे.महागाईची कारणे अनेक असू शकतात; मात्र तिचा भार कोणाच्या खांद्यावर पडतो, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. साठेबाजी, कृत्रिम टंचाई, अनावश्यक दरवाढ किंवा बाजारातील गैरप्रकार यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असतील, तर संबंधित यंत्रणांनी कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. केवळ दरवाढीचे आकडे जाहीर करून प्रश्न सुटणार नाही. बाजारपेठेतील प्रत्यक्ष परिस्थितीवर लक्ष ठेवून ग्राहकांना दिलासा देणारी ठोस उपाययोजना करावी लागेल.शासनाने जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. साठेबाजी आणि कृत्रिम दरवाढीवर कठोर कारवाई, पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नियोजन, शेतमालाला योग्य दर आणि ग्राहकांना वाजवी किमतीत वस्तू उपलब्ध होण्यासाठी पारदर्शक बाजारव्यवस्था आवश्यक आहे. शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठीही दीर्घकालीन उपाययोजना करणे गरजेचे आहे. कारण शेतकरी सक्षम असेल, तरच अन्नधान्याचा पुरवठा स्थिर राहील आणि ग्राहकांनाही त्याचा फायदा मिळेल.महागाईशी लढा हा केवळ शासनाचा विषय नाही; मात्र त्याची प्रमुख जबाबदारी निश्चितच शासन आणि संबंधित यंत्रणांची आहे. बाजारपेठेतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवताना ग्राहकांची क्रयशक्ती आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. जनसामान्यांना दोन वेळचे अन्न, मुलांचे शिक्षण आणि भविष्यासाठी थोडी बचत यासाठी सतत संघर्ष करावा लागत असेल, तर विकासाच्या आकडेवारीकडे पाहण्यापेक्षा त्यांच्या घरातील चुलीची स्थिती पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते.महागाईच्या वाढत्या चटक्याने सर्वसामान्यांच्या आर्थिक बजेटची घडी विस्कटली आहे. घरखर्च कमी करण्यासाठी नागरिकांना आपल्या गरजांवरच मर्यादा घालाव्या लागत असतील, तर ही निश्चितच चिंतेची बाब आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी तात्पुरत्या उपायांबरोबरच उत्पादन, पुरवठा, वितरण आणि बाजारव्यवस्थेत दीर्घकालीन सुधारणा करणे आवश्यक आहे. अन्यथा महागाईचा प्रश्न केवळ महिन्याच्या किराणा बिलापुरता न राहता सामान्यांच्या जीवनमानावर दीर्घकालीन परिणाम करणारे आर्थिक संकट ठरू शकतो. सरकारने वेळीच जागे होऊन महागाईला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलावीत, हीच जनसामान्यांची अपेक्षा आहे.*

## जड़का शहापुरात शिवसेना जिल्हाप्रमुख आशीष धर्माळे यांचा धडाका

# अवैध उत्खननावर गावकऱ्यांसह धाड टाकून खाण माफियांचे धाबे दणाणले!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती** मौजा शहापूर येथील सर्व्हे नं. १३ मधील खाणीत नियम धाब्यावर बसवून रोज सुरू असलेल्या बेकायदेशीर उत्खननाविरोधात शिवसेना जिल्हाप्रमुख आशीष धर्माळे यांनी गावकऱ्यांच्या साथीने थेट खाणीवर धडक मारत मोठा भांडाफोड केला. या आक्रमक कारवाईमुळे खाण माफियांची पळापळ झाली असून, माहिती मिळताच महसूल प्रशासनाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी घटनास्थळी धाव घेऊन अवैध कामाचा स्थल पंचनामा केला.रोज रात्री-अपरात्री बेकायदेशीर उत्खननसर्व्हे नं. १३ (क्षेत्र ४०४ आर) मधील जमिनीवर शासकीय नियमांची पायमल्ली करत रोज मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याची कुणकुण गावकऱ्यांना लागली होती. शिवसेना जिल्हाप्रमुख आशीष धर्माळे यांना ही माहिती मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता स्थानिक गावकऱ्यांना सोबत घेऊन थेट खाणीवर धाड टाकली आणि सुरू असलेला गैरप्रकार रंगेहात पकडला.ॲटलास कॉम्प्रेसर अन् पोकलँड जप्त करण्याच्या तयारीत प्रशासनधर्माळे यांच्या आक्रमक पवित्रा आणि गावकऱ्यांच्या रोषामुळे महसूल मंडळाधिकारी (सी. बी. वाघमोडे) व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळ गाठले.

दुपारी १२.३० ते १.१५ या वेळेत पंचांसमक्ष करण्यात आलेल्या पाहणीत ११ फूट खोलीचे व १०० II चे तब्बल ११ बोअर (खड्डे) बेकायदेशीरपणे पाडल्याचे उघड झाले. २४ ऑगस्टपासून ड्रिल मशीनद्वारे हे बोअर पाडल्याची कबुली खाण मॅनेजर पंकज कैलास ठोके याने दिली. तसेच पश्चिमेला कोबेलको कंपनीची पोकलँड मशीन सज्ज आढळून आली.परप्रांतीय रॅकेटचा पर्दाफाशघटनास्थळी पकडलेला ड्रिल मशिन ऑपरेटर अंगद रामेश्वर सहानी (वय २२, रा. देवरिया, उत्तर प्रदेश) याने हे मशिन 'रिनु शेखावत' (रा. राजस्थान) यांच्या मालकीचे असल्याचे सांगितले. परराज्यातून मशिनरी आणि कामगार आणून स्थानिक प्रशासनाचा महसूल बुडवणाऱ्या मोठ्या रॅकेटचा या धाडीमुळे पर्दाफाश झाला आहे.

### दोषींवर गुन्हे दाखल करा, अन्यथा गाठ माझ्याशी:

आशीष धर्माळेया पंचनाम्यावर शिवसेना जिल्हाप्रमुख आशीष धर्माळे यांच्यासह विद्यासागर ढोले, रविंद्र काकडांदे, अजय गवई, दिलीप ठाकरे या पंचांच्या व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.-

# सात तासांनंतर 'शोले स्टाईल' आंदोलनाचा थरार

## बीएसएनएल टॉवरवर चढलेल्या इसमाची सुखरूप सुटका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.धामणगाव रेल्वे :**
कुटुंबीयांवरील राग आणि पोलिसांनी तक्रार न घेतल्याचा आरोप करत बडनेरा येथील ४२ वर्षीय गोविंद गवई यांनी धामणगाव शहरातील अमर शहीद भगतसिंग चौकाजवळील बीएसएनएलच्या सुमारे २०० फूट उंच टॉवरवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन केल्याने मंगळवारी परिसरात मोठी खळबळ उडाली. तब्बल सात तासांच्या प्रयत्नांनंतर अखेर बहिणीच्या फोनवरील विनंतीनंतर गवई खाली उतरले. मिळालेल्या माहितीनुसार, गोविंद गवई यांचा १२ वर्षांपूर्वी धामणगाव तालुक्यातील दिघी महल्ले येथील मुलीशी विवाह झाला होता. कौटुंबिक हिंसाचार संरक्षक कायदा २००५ च्या कलम १२ अंतर्गत खावटीचे प्रकरण मागील सहा वर्षांपासून धामणगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. याच प्रकरणाच्या तारखेसाठी गवई धामणगाव येथे आले होते. न्यायालयाच्या आवारात त्यांचा मेव्हण्यासोबत वाद झाला. त्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात तक्रार करण्याची मागणी केली तसेच ११२ क्रमांकावरही संपर्क साधला.दरम्यान, दुपारी सुमारे चार वाजता गवई यांनी बीएसएनएल टॉवरवर चढण्यास सुरुवात केली आणि सुमारे २०० फूट उंचीवर जाऊन बसले. माहिती मिळताच पोलिस, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन पथक आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. गवई यांना खाली उतरविण्यासाठी मोबाईलवरून विनंती करण्यात आली. मात्र त्यांनी पत्नी, सासू आणि मेव्हण्याला घटनास्थळी बोलावण्याची मागणी केली. त्यानुसार त्यांना आणण्यात आले; तरीही संबंधित पोलिस कर्मचाऱ्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत खाली उतरणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली.अखेर सुमारे सात तासांनंतर बहिणीने फोनवरून गवई यांची समजूत घातली. त्यानंतर ते सुरक्षितपणे खाली उतरले. पुढील तपासासाठी दत्तापूर पोलिसांनी प्रक्रिया सुरू केली असून गवई यांना वैद्यकीय तपासणीसाठी धामणगाव ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकारामुळे भगतसिंग चौक परिसरात मोठी गर्दी होऊन काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी खबरदारी घेत परिस्थिती नियंत्रणात ठेवली.

# मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमनाबाबत व्यापक मोहिम हाती घेणार -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती,**
जिल्हा स्त्री रूग्णालयातील घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मोठ्या आस्थापनांमध्ये अग्निशमन यंत्रणा असावी, यासाठी पाहणी करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांच्या गर्दीच्या ठिकाणी आगीचा प्रकार घडू नये, यासाठी व्यापक मोहिम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज फायर ऑडीट आणि फायर सेफ्टी ऑडीट, इतर उपाययोजनांबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयात घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी उपायायोजना करण्यावर भर दिला. यासाठी जिल्ह्यातील सर्व मोठ्या आस्थापना आणि शासकीस कार्यालयांची येत्या आठ दिवसांत पाहणी करावी. यात प्रामुख्याने अग्निशमनाबाबत उपाययोजना सुचविण्यात याव्यात. तसेच या सूचना पुढील आठ दिवसात अंमलात आणाव्यात. यासाठी आस्थापनांना जबाबदार धरून त्यांच्याकडून अग्निशमन यंत्रणांची दुरूस्ती, देखभाल आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन यंत्रणा बसविण्याबाबत



कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत राखण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण दर महिन्याला देण्यात यावे. तसेच ही यंत्रणा संबंधित आस्थापनांना सोपविताना जबाबदारी निश्चित करण्यात यावी. जोखमीच्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणा स्वयंचलित मोडमध्ये ठेवण्यात यावी. तसेच याची नियमित देखभाल आणि दुरूस्ती करण्यावर भर देण्यात यावा. यात प्रामुख्याने स्वयंचलित यंत्रणा कार्यक्षम असल्याची खात्री करावी. अग्निशमन यंत्र वापराबाबत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी याचे प्रात्यक्षिक घेण्यात यावे. यातील सुरक्षा विषयक कामांमध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही.रूग्णालयात विजेच्या नियंत्रित वापरावर असलेल्या वैद्यकीय उपकरणांना स्टॅबिलायझर जोडण्यात यावेत. तसेच स्मोक डिटेक्टर कार्यान्वीत होण्यासाठी या यंत्रणेची नियमीत देखभाल करण्यात यावी. मोठ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार फायर सिलींडर, होज पाईप किंवा स्प्रिंकलर व्यवस्था करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणेच्या पाहणीसाठी शहरी भागात ५० आणि ग्रामीण भागात ५० टिम तयार करण्यात येतील. त्यानंतर त्यांच्या सूचनेनुसार अग्निशमनाबाबत सुधारणा करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सांगितले.

# सीमेवरील जवानांना युवा स्वाभिमान महिला आघाडीकडून राख्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**
रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांप्रती कृतज्ञता आणि बंधुभाव व्यक्त करण्यासाठी युवा स्वाभिमान पार्टीच्या महिला आघाडीच्या वतीने राख्या पाठविण्यात आल्या. जिल्हाधिकारी अमरावती यांच्या माध्यमातून या राख्या सीमेवरील जवानांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.देशाच्या सुरक्षेसाठी ऊन, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांना रक्षाबंधनानिमित्त आपुलकीचा संदेश देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.देशाचे रक्षण करणारे जवान हे आपल्या सर्वांचे भाऊ आहेत. त्यांच्या शौर्याला सलाम करत प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रक्षाबंधना निमित्त राख्या पाठविण्यात आल्या आहेत, अशी भावना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.या उपक्रमातून सैनिकांप्रती असलेला सन्मान, बंधुभाव आणि राष्ट्रप्रेमाची भावना समाजात अधिक दृढ होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.या उपक्रमाला ज्योतीताई सैरीसे, प्रेमाताई लव्हाळे, मार्गदर्शिका ज्योतीताई यावलीकर, कामगार अध्यक्षा वंदनाताई जामनेकर, बडनेरा शहर अध्यक्षा समीक्षा गोटेफोडे, पंचायत समिती सदस्य जयाताई तेलखडे यांच्यासह कल्पनाताई शर्मा, ज्योती वैद्य, शोभा कीटके, रंजना रगड, सुनीता मोलके, भावना राऊत, सीमा लवनकर, कल्पना मेश्राम, शिल्पा मोलके, सोनाली विधाते आदी उपस्थित होते. होलीपीस इंग्लिश हायस्कूल, हॉलीवूड कॉलनी येथील विद्यार्थीनी तसेच युवा स्वाभिमान पक्षाच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही सहभाग घेतला.

# युवानीच्या मृत्यूची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

## धारणीत उपोषण सुरू, पीडित कुटुंबाला २० लाखांची मदत देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६धरणी –** धारणी उपजिल्हा रुग्णालयातील कथित वैद्यकीय हलगर्जीपणामुळे चार वर्षीय युवानी ईश्वर जावरकर हिचा चार ऑगस्ट रोजी मृत्यू झाला, असा आरोप करीत दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी सोमवारी (ता. २४) एसडीओ कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले. राणामालूर येथील उपसरपंच नीतेश भिलावेकर आणि समाजसेवक नीरज चिरोटे हे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. युवानीचे कुटुंबीय, ग्रामस्थ तसेच मेळघाटातील नागरिकांनी आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपोषणाला पाठिंबा दिला. युवानीच्या मृत्यूला नेमके कोण जबाबदार आहेत, याची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषी डॉक्टरांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. तसेच धारणी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. जावरकर यांची प्रशासकीय जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई



करावी, अशी मागणीही करण्यात आली. धारणी उपजिल्हा रुग्णालयातील उपचार व्यवस्थेबाबत यापूर्वीही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. रुग्णालयात सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध असतानाही गर्भवती महिलांना बाहेर सोनोग्राफीसाठी पाठविले जात असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे रुग्णालयातील संपूर्ण आरोग्य व्यवस्थेची चौकशी करण्यासाठी तातडीने स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. युवानीच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यासोबतच संबंधित डॉक्टरांच्या वैद्यकीय परवान्याबाबतही नियमानुसार कार्यवाही करावी, तसेच पीडित कुटुंबाला शासनाकडून २० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. युवानीला न्याय मिळेपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका नीतेश भिलावेकर आणि नीरज चिरोटे यांनी घेतली आहे. युवानीच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कारवाई होते का आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळतो का, याकडे आता मेळघाटातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# चायनामेड व्हेंटिलेटर अन् टक्केवारीच्या हव्यासाने तीन चिमुकल्यांचा जीव?

## स्प्रिंकलर-स्मोक डिटेक्टरवरील प्लास्टिक कव्हर न काढल्याने यंत्रणाच ठप्प?

### सुनील देशमुखांचा प्रशासनावर घणाघाती आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती :**

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील भीषण अग्निकांडात तीन नवजात बाळांचा मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असतानाच, माजी मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. सुनील देशमुख यांनी प्रशासनावर गंभीर आणि धक्कादायक आरोप केले आहेत. रुग्णालयातील अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित होती की केवळ कागदोपत्रीच, असा सवाल उपस्थित करत त्यांनी संपूर्ण प्रकरणाच्या मुळाशी जाण्याची मागणी केली आहे.रुग्णालयातील स्प्रिंकलर आणि स्मोक डिटेक्टरवर बसवण्यात आलेले प्लास्टिकचे कव्हरच काढण्यात आले नव्हते. त्यामुळे आग लागल्यानंतर स्मोक डिटेक्टरचा अलार्म वाजला नाही आणि स्प्रिंकलरमधून पाण्याचा फवारा देखील झाला नाही, असा आरोप देशमुख यांनी केला. तीन नवजात बालकांचा जीव जाण्याइतकी गंभीर घटना घडूनही प्रशासनाची जबाबदारी निश्चित होत नसेल तर सर्वसामान्यांनी न्यायासाठी कोणाकडे पाहायचे,



असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.यापेक्षाही गंभीर आरोप करताना देशमुख यांनी रुग्णालयात बसवण्यात आलेल्या 'सिनलर' कंपनीच्या व्हेंटिलेटरच्या गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे व्हेंटिलेटर ड्युप्लिकेट आणि 'चायनामेड' असल्याचा आरोप त्यांनी केला. या यंत्रांच्या खरेदी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर टक्केवारीचा व्यवहार झाल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. त्यामुळे संबंधित व्हेंटिलेटरची खरेदी कोणी केली, त्याची तांत्रिक तपासणी कोणी केली, प्रमाणपत्रे कोणत्या आधारावर देण्यात आली आणि देखभालीची जबाबदारी कोणाची होती, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे.सध्याचे प्रशासन कोणाच्याही धाकात राहिलेले नाही. त्यामुळे सर्वसामान्यांनी न्यायासाठी कोणाकडे पाहायचे? असा थेट सवाल करत देशमुख यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच बोट ठेवले.दरम्यान, तीन चिमुकल्यांच्या मृत्यूला नेमकी कोणती यंत्रणा, अधिकारी किंवा तांत्रिक त्रुटी कारणीभूत ठरली, याचा तपास सुरू आहे. देशमुख यांनी केलेले व्हेंटिलेटर बनावट असल्याचे तसेच खरेदीत टक्केवारी झाल्याचे आरोप मात्र चौकशीत सिद्ध होणे बाकी आहे. त्यामुळे या आरोपांची अधिकृत चौकशी होऊन सत्य बाहेर येणार का, याकडे आता अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

# मान्यता मिळूनही संलग्नीकरण रखडले

## तीन रुग्णालयांबाबत अधिष्ठातांची नाराजी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती १४



### मूलभूत सुविधांचा अभाव

ऑपरेशन थिएटर, प्रशस्त सेमिनार हॉल, ऑडिओ, व्हिडिओची व्यवस्था, ओपीडी, डॉक्टरांना पदानुसार बसण्याची व्यवस्था, या महत्त्वाच्या सुविधा अद्यापही शासकीय महाविद्यालय सुरू होऊन दोन वर्षे झाली तरीही उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाही. पदव्युत्तर (एमडी) शिक्षण सुरू करायचे झाल्यास या मूलभूत सुविधेची नितांत गरज आहे, असे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मान्यता मिळून दोन वर्षे होत आहेत. त्यांच्याकरिता ५० टक्के पदनिर्मितीही करण्यात आली. परंतु अद्याप तीनही मोठी रुग्णालये ही वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडे सोपविण्यात आलेली नाहीत. हा तिढा अद्यापही कायम आहे. अमरावती शहरात संदर्भसेवा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) व जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन), अशी तीन मोठी रुग्णालये आहेत. डफरीन व सुपर स्पेशालिटी, या दोन्ही रुग्णालयाच्या स्वतंत्र नव्या इमारतीही असून, त्या आता वैद्यकीय महाविद्यालयाला मान्यता मिळाल्यानंतर त्यांच्याकडे सोपविण्यात याव्यात, अशी मागणी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नंदकिशोर राऊत यांच्याकडून संबंधित विभागाला करण्यात आलेली आहे. परंतु वरिष्ठ स्तरावरून त्याचा निर्णय झालेला नसल्यामुळे हा पेच कायम असल्याचे दिसून येते. त्यामुळे येथील डॉक्टर, परिचारिकांसह उपस्थित असलेले इतर पदेही निर्माण करण्यात आलेली असताना, ती आवश्यकतेनुसार इतर तीनही रुग्णालयांत दैनंदिन कामासाठी पाठविण्यात येते.

तिन्ही रुग्णालये नव्हे, तर निदान दोन रुग्णालये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न झाली असती तर तशा सुविधा निर्माण करता आल्या असत्या. ज्या समस्या उद्भवत आहेत त्यावर नियंत्रण आणता आले असते. सकारात्मक कामासाठी पाठबळ मिळाले नाही. -डॉ. नंदकिशोर राऊत, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती.

# पुढाऱ्यांनो जरा इकडेही लक्ष द्या .....

## जिल्हा सामान्य रुग्णालयात एजंटांचा सुळसुळाट

### तातडीने प्रमाणपत्र हवे असल्यास मोजावे लागतात पैसे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती १

जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये बाहेरच्या व्यक्तींचा वापर आता आम बात झाली आहे. बाहेरच्या एजंटांकडून येथे तातडीने कामे करून दिल्या जातात. याठिकाणी कामासाठी येणाऱ्या गरजूंच्या चेहऱ्यावरील हावभाव हे लोकं सहज ओळखून त्यांच्याशी जवळीक साधतात. काही पैसे घेऊन विविध सर्टिफिकेट दहा ते पंधरा मिनिटांच्या आत तयार करून देतात. मंगळवारी (ता. २५) 'सकाळ'च्या चमूने जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन येथील व्यवस्थेचे स्कॅनिंग केले. येथे नक्कीच चांगली कामे होतात, या दूमत नाही. परंतु त्या चांगल्या कामांच्या आड काही गैरकामेही केल्या



जातात. यासर्वच बाबी पडद्याआड होतात, असेही नाही तर उघड-उघडपणे केल्या जात असल्याची धक्कादायक माहिती 'सकाळ टीम'च्या हाती लागली. येथील ओपीडी पहाटे नऊच्या सुमारास सुरू होऊन दुपारी एक ते दीड वाजेपर्यंत येथे रुग्णतपासणी केल्या जाते. साधारणतः तासाभऱ्यानंतर येथे नोंदणी कक्षाच्या समोर रुग्ण व नातेवाइकांची गर्दी व्हायला सुरवात होते. त्याचवेळी एकामागोमाग एक पाच ते सहा खासगी व्यक्ती आतमध्ये शिरतात. चिंताग्रस्त चेहरे बघून साहेब तुम्हाला काय हवे.. ताई तुमचे काम आम्ही करून देतो.. असे आश्वासन देऊन काही मिनिटे चर्चा केल्यानंतर संवाद मूळ मुद्द्यावर आणतात. कुछ खर्चापाणी करना होगा म्हणून.. तो व्यक्तीची नस पकडण्याचा प्रयत्न करतो. चिरीमिरी करायला (पैसे) देण्यासाठी होकार देणाऱ्या व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तींची ओळख करून देतात. मंगळवारी आमच्या छायाचित्रकाराला एका एजंटने पकडले. काय हवे म्हणून त्याला विचारणा केली. छायाचित्रकाराने फिटनेस प्रमाणपत्र हवे असल्याचे सांगताच पहिल्या व्यक्तीने त्याकरिता सहाशे रुपये, असा दर सांगितला. त्यानंतर तो छायाचित्रकाराला ओपीडीच्या बाहेर घेऊन आला. त्याने दुसऱ्या व्यक्तीची ओळख करून दिली. त्या व्यक्तीने फिटनेस प्रमाणपत्राकरिता एक हजार रुपये दिल्यास पंधरा ते वीस मिनिटांत फार्म भरून काम होते, अन्यथा त्याकरिता स्वत: प्रयत्न कराल तर तेरा ते चौदा चाचण्या कराव्या लागतील, अशी भीती दाखविली. छायाचित्रकाराला ओपीडी कार्ड काढायला लावले. कार्ड काढल्यानंतर पंधरा मिनिटे चर्चा झाली, परंतु अखेर छायाचित्रकार तेथून निघून गेले.

### कोणीच लक्ष द्यायला तयार नाही

जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये सुरक्षा महामंडळाचे सुरक्षारक्षक नेमण्यात आलेले आहेत. शिवाय अन्य खासगी एजन्सीचे सुरक्षारक्षक येथे आधीपासूनच तैनात होते. त्या सुरक्षारक्षकांना एजंटचा वावर आहे, बाहेरच्या व्यक्ती आहेत, याची कल्पना असताना ते त्यांना कधीच हटकताना दिसत नाहीत. परंतु खऱ्या अर्थाने येथे काम करण्यासाठी येणाऱ्यांना मात्र ओळखपत्र दाखवा, म्हणून विचारणा करतात. यावरून एजंटांची मुजोरी किती वाढत आहे, हे दिसून येते.

# शिशूंच्या मृत्यूस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा



## जिल्हा स्त्री रुग्णालयातील घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची युवक काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात झालेल्या अग्निदुर्घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित यंत्रणेवर कठोर कारवाई करावी, तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे तातडीने अग्निसुरक्षा व विद्युत सुरक्षा परीक्षण करावे, अशी मागणी जिल्हा युवक काँग्रेसने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली. दुर्घटनेची निष्पक्ष व तांत्रिक चौकशी करून दोषी अधिकारी व यंत्रणेची जबाबदारी निश्चित करावी. संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक व अन्य जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी करण्यात आली. २०२२-२३ मध्येही अशाच प्रकारची घटना घडली होती. त्यावेळी ज्या कंपनीची यंत्रसामग्री वापरण्यात आली होती, त्या कंपनीवर कारवाई न करता पुन्हा त्याच कंपनीची यंत्रसामग्री का वापरण्यात आली, याचीही चौकशी करावी. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे अग्निसुरक्षा व विद्युत सुरक्षा परीक्षण तातडीने करावे. नवजात शिशू अतिदक्षता विभाग, नवजात शिशू काळजी विभाग, अतिदक्षता विभाग तसेच प्रसूती विभागातील जीवनरक्षक वैद्यकीय उपकरणांची सुरक्षा व देखभाल तपासावी. सर्व रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा कार्यपद्धती (एसओपी) लागू करून नियमित आपत्कालीन सराव घेणे अनिवार्य करावे, अशी मागणीही करण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत नवजात बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी विशेष आपत्कालीन स्थलांतर कार्यपद्धती लागू करावी. मृत बालकांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत तातडीने आर्थिक मदत मिळवून द्यावी तसेच जखमी बालकांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने करावा, अशी मागणी युवक काँग्रेसने केली. भविष्यात अशा दुर्दैवी घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करून त्याचा अहवाल शासनाला सादर करावा, अशी मागणी जिल्हा युवक काँग्रेसने केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश उपाध्यक्ष एनएसयूआय संकेत कुलट, उपाध्यक्ष नितीन काळे, विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, ब्लॉक अध्यक्ष गुड्डू हमीद, वेदांत केने, स्वराज पोटे, गोपाल पडोळकर, जुबेर भाई उपस्थित होते.

# महावितरणच्या निष्काळजी कारभाराने जीव धोक्यात

## झाडांच्या फांद्यांतून वीजतारा, तिरके खांब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अचलपूर**

शहरासह ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी महावितरणच्या विद्युत यंत्रणेची अवस्था धोकादायक बनली आहे. तिरपे खांब व झाडांच्या फांद्यांमधून वीजतारा गेल्या आहेत, तर काही विद्युत खांबांना वेलींचा विळखा पडला आहे. या गंभीर बाबीकडे वरिष्ठांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी सुज्ञ नागरिकांकडून पुढे येत आहे. पावसाळ्यापूर्वी महावितरणकडून विद्युत वाहिन्यांची पाहणी, झाडांच्या फांद्यांची छाटणी, तिरपे विद्युत खांब सरळ करणे, आवश्यक ठिकाणी नवीन खांब उभारणे, लोंबकळलेल्या तारा व्यवस्थित करण्यासह विद्युत यंत्रणेची देखभाल-दुरुस्ती करणे अपेक्षित असते. मात्र, पावसाळा सुरू होऊन दोन महिने अधिकचा कालावधी उलटूनही शहर आणि ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली दिसत नसल्याचे विद्युत ग्राहकांचे म्हणणे आहे. उलट गेल्या काही महिन्यांत विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढले असून गैरसोयीत भर पडली असल्याचे ग्राहक सांगतात. त्यामुळे देखभाल दुरुस्तीच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून संबंधित अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे. या गंभीर बाबींकडे वरिष्ठ केव्हा लक्ष देणार? असा सवाल विद्युत ग्राहक उपस्थित करीत आहेत. अनेक ठिकाणी विद्युत तारा थेट झाडांच्या फांद्यांमधून गेल्या आहेत. वाऱ्यामुळे फांद्या तारांना घासल्यास किंवा तारांवर पडल्यास वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच शॉर्टसर्किट होण्याचा धोका आहे. पावसाळ्यात झाडे व विद्युत वाहिन्यांचा संपर्क अधिक धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी महावितरणने या धोकादायक वाहिन्यांची तातडीने दुरुस्ती व आवश्यक उपाययोजना राबवाव्या, अशी मागणी होत आहे.



एप्रिलमध्ये मॉन्सूनपूर्व कामादरम्यान ट्री-कटिंग करण्यात आली होती. परंतु पावसानंतर काही वेली वेगाने वाढतात. त्या वेली तसेच ट्री-कटिंगची कामे सुरू करण्यात आली आहेत. तिरपे खांब व इतर दुरुस्तीचे कामही प्राधान्याने करण्यात येणार आहे.
**-प्रशांत फुटाणे,** प्रभारी कार्यकारी अभियंता.

वीजखंडितीचे प्रमाणही वाढले झाडांच्या फांद्या विद्युत तारांना स्पर्श करीत असल्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकारही वाढले आहेत. वारंवार वीज जाण्यामुळे घरगुती ग्राहकांसह दुकानदार, व्यावसायिक आणि इतर वीजग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे एकीकडे अपघाताचा धोका, तर दुसरीकडे वारंवार वीजखंडिती, अशा दुहेरी संकटात नागरिक सापडले आहेत.

# गणेश चौकात गुंजला 'बदलाव जरूरी हैं'चा नारा

## नेरपिंगळाईत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जनजागरण सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नेरपिंगळाई**




'बदलाव जरूरी है..चलो दिल्ली!' या घोषणांनी नेरपिंगळाई येथील गणेश चौक परिसर दुमदुमून गेला. एक सप्टेंबरच्या 'चलो दिल्ली' अभियानाच्या पार्श्वभूमीवर भारतीय कम्युनिस्ट पक्ष शाखा नेरपिंगळाईच्या वतीने जनजागरण सभेचे आयोजन करण्यात आले होते. क्रांतिकारी कलापथकाच्या माध्यमातून सादर झालेल्या कार्यक्रमामुळे सभेला विशेष रंगत आली. शाहीर धम्मा खडसे यांच्या क्रांतिकारी गायनाने उपस्थित भारावून गेले. देशातील अराजकता, वाढती महागाई, बेरोजगारी, विद्यार्थी व तरुणांवरील अन्याय, महिला सुरक्षितता, जातीयवाद आणि भ्रष्टाचार, यासारख्या प्रश्नांचा त्यांनी गीतांच्या माध्यमातून परखड समाचार घेतला. अन्यायाविरोधात संघर्ष करण्याचे आवाहनही करण्यात आले. प्रा. डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे यांनी शेती व शेतीच्या अर्थकारणाचा आढावा घेतला. वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाच्या भावातील अनिश्चितता, बाजारपेठेतील अडचणी, कर्जबाजारीपणा आणि नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट होत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या प्रश्नांकडे त्यांनी लक्ष वेधले.

यावेळी सुनील मेटकर यांनी कष्टकरी जनतेच्या प्रश्नांसाठी पक्षाने केलेल्या संघर्षाची माहिती देत सर्वसामान्य जनतेने या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. तसेच एक सप्टेंबरच्या 'चलो दिल्ली' अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष शाखा नेरपिंगळाईच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. समविचारी पक्ष व मित्रपक्षांच्या सहकार्यामुळे जनजागरण सभेला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. क्रांतिकारी गीतांचा जोश, वक्त्यांचे विचार आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला.

# अवैध सावकारीवर कारवाई, परतवाडा-धोतरखेड्यात ४ पथकांचे छापे:

## कोरे स्टॅम्प, धनादेश आणि खरेदीखतांसह ६९ संशयास्पद दस्तऐवज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६परतवाडा** - शहर आणि धोतरखेडा परिसरात सर्रास सुरू असलेल्या अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने आज धडक कारवाई केली. येथील जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या आदेशानुसार गठित चार विशेष पथकांनी पोलीस ताफ्यासह वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी धाडी टाकल्या. या कारवाईत कोरे स्टॅम्प, कोरे धनादेश, इसारचिठ्ठी आणि खरेदीखतांसह एकूण ६९ संशयास्पद दस्तऐवज जप्त करण्यात आले. अचलपूरच्या सहायक निबंधक कार्यालयाकडे अवैध सावकारी संदर्भात अनेक गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने सकाळी साडेदहाच्या सुमारास ही मोहीम राबवण्यात आली. या धडक कारवाईमुळे अवैध सावकारांचे धाबे दणाणले आहेत.पहिल्या पथकाने सकाळी ११.१५ वाजता विद्यानिकेतन कॉलनी, परतवाडा येथील संजय ओंकारराव बोरखडे यांच्या घरी धाड टाकली. सहायक निबंधक प्रीती धामणे (तिवसा) यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने कोऱ्या स्टॅम्पसह २ संशयास्पद दस्तऐवज जप्त करून सील केले.

दुसऱ्या पथकाने गोपाळ नगर, गौरखेडा रोड येथील सुनील पांडुरंगजी नेमाडे यांच्या निवासाची झडती घेतली. सहायक निबंधक स्वाती गुडधे (मोर्शी) यांच्या नेतृत्वाखालील या पथकाने सकाळी ११ ते दुपारी २.४० या वेळेत कारवाई केली. या कारवाईत



तब्बल ५१ संशयास्पद दस्तऐवज हस्तगत करण्यात आले. यामध्ये कोरे स्टॅम्प, कोरे धनादेश, उसनवार चिठ्ठी, करारनामा, स्थावर मालमत्ता खरेदीखत आणि इसारचिठ्ठीचा समावेश आहे.सहायक निबंधक परेश गुल्हाने (अचलपूर) यांच्या नेतृत्वाखालील पथकाने धोतरखेडा येथील दादाराव साहेबराव वरघट यांच्या घरी सकाळी ११.२१ ते दुपारी २ च्या दरम्यान कारवाई केली. या ठिकाणाहून १६ संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आली. त्यात भाडे करारनामा, इसारचिठ्ठी, खरेदीखत, गाव नमुना ८ (अ) आणि ७/१२ चा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची 'महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' मधील कडक तरतुदींनुसार तपासणी केली जाणार आहे. विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन व जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली अचलपूरचे सहायक निबंधक परेश गुल्हाने पुढील कायदेशीर पडताळणी व चौकशी करणार आहेत. या धडक कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

दरम्यान, सहायक निबंधक आशिष चर्जन (वरुड) यांच्या नेतृत्वातील एका पथकाने संतोषी नगर, परतवाडा येथील अशोक पांडुरंगजी नेमाडे यांच्या घरी सकाळी १०.५० ते दुपारी १ या वेळात झडती घेतली. मात्र, या ठिकाणी कोणतेही संशयास्पद दस्तऐवज आढळून आले नाहीत.

# जिल्हाधिकारी कार्यालयात ठाकरे सेनेचा आक्रमक पवित्रा

## दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती–** अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील अग्नितांडवात तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी सुरू असतानाच आज जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय वातावरण चांगलेच तापले. चौकशी समितीची बैठक सुरू असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्यासह ठाकरे सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक पवित्रा घेत जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले.दरम्यान, उच्चस्तरीय चौकशी समितीचे अध्यक्ष तथा आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्यासोबत ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

या बैठकीत जिल्हा स्त्री रुग्णालयातील अग्नितांडवाच्या घटनेला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.विशेषतः जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार तसेच संबंधित कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी सुषमा अंधारे व ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. रुग्णालयातील सुरक्षाव्यवस्था, उपकरणांची देखभाल, फायर ऑडिट तसेच प्रशासनाच्या कथित हलगर्जीपणाची सखोल चौकशी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.तीन निष्पाप नवजात बालकांचा जीव गेल्यानंतरही केवळ चौकशीपुरते प्रकरण मर्यादित न ठेवता दोषींवर फौजदारी कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका ठाकरे सेनेकडून मांडण्यात आली. त्यामुळे चौकशी समितीच्या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय वातावरण चांगलेच तापले.

# सात दिवसांचे उउढत फुटेज उघडणार ‘स्त्री रुग्णालय’ अग्निकांडाचे गूढ

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती :** अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक प्रकरणाच्या चौकशीला आता वेग आला आहे. आरोग्य विभागाकडून सुरू असलेल्या अंतर्गत चौकशीचा आज दुसरा दिवस असून, आरोग्य विभागाचे आयुक्त तथा चौकशी समितीचे अध्यक्ष आज अमरावतीत दाखल होणार आहेत. त्यामुळे या चौकशीत नेमके कोणते धक्कादायक तथ्य समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, चौकशी समितीने जिल्हा शल्यचिकित्सकांकडे रुग्णालयातील मागील सात



दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज मागितले आहे. या फुटेजच्या तपासणीतून घटनेच्या आधी आणि घटनेच्या वेळी रुग्णालयातील संबंधित विभागात नेमकी काय परिस्थिती होती, याचा उलगडा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज हा या चौकशीतील महत्त्वाचा पुरावा ठरणार आहे.व्हेंटिलेटरचा स्फोट नेमका किती वाजता झाला, त्यावेळी वार्डमध्ये कोण कोण उपस्थित होते, व्हेंटिलेटरजवळ कोणती हालचाल झाली होती आणि आग नेमकी कोणत्या

### आरोग्य विभागाच्या चौकशीला वेग


परिस्थितीत लागली, याचा तपास सीसीटीव्हीच्या माध्यमातून केला जाणार आहे. तसेच आग लागल्यानंतर रुग्णालय प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी तातडीने कोणती पावले उचलली, याचीही माहिती फुटेजमधून मिळण्याची शक्यता आहे.या घटनेनंतर रुग्णालयातील अग्निसुरक्षा व्यवस्था, व्हेंटिलेटरची देखभाल, मशिनरीची तपासणी आणि संबंधित यंत्रणांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे चौकशी समितीसमोर केवळ स्फोटाचे कारण शोधण्याचेच नव्हे, तर घटनेपूर्वी आणि घटनेनंतरच्या प्रशासनाच्या भूमिकेचीही जबाबदारी निश्चित करण्याचे आव्हान आहे.आज आरोग्य विभागाचे आयुक्त आणि चौकशी समितीचे अध्यक्ष अमरावतीत आल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक होण्याची शक्यता आहे. सात दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज, रुग्णालयातील नोंदी आणि उपलब्ध तांत्रिक माहितीच्या आधारे चौकशीला निर्णायक दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.तीन निष्पाप बालकांचा जीव घेणाऱ्या या घटनेमागचे खरे कारण काय, याचा पर्दाफाश चौकशीअंती होणार आहे–

# राज्यभर १० हजार ‘व्हेंटिलेटर बॉम्ब’!

## अमरावतीमधील रुग्णालयाला व्हेंटिलेटर पुरवणाऱ्या कंपनीवर संशयाचे ढग

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती–** जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) येथील नव्या इमारतीमध्ये २४ ऑगस्ट रोजी झालेल्या व्हेंटिलेटर स्फोटात ३ नवजात चिमुकल्यांचा करुण अंत झाला आहे. मात्र ज्या ‘शिल्लर’ कंपनीच्या व्हेंटिलेटरचा डफरीनमध्ये स्फोट झाला, त्याच कंपनीचे तब्बल १० हजारांपेक्षा जास्त व्हेंटिलेटर्स सध्या राज्यभरातील विविध शासकीय रुग्णालयांमध्ये आहेत. या गंभीर बाबीमुळे संपूर्ण राज्यातील शासकीय आरोग्य यंत्रणेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मंगळवारी डफरीन रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करून ‘शिल्लर’ कंपनीच्या प्रतिनिधींची कसून चौकशी केली.या संपूर्ण प्रकरणाच्या तांत्रिक आणि प्रशासकीय चौकशीसाठी बुधवार, २६ ऑगस्ट रोजी उच्चस्तरीय समिती अमरावतीत दाखल होत आहे. ही समिती घटनास्थळाची सूक्ष्म पाहणी करेल. त्यामुळे समितीच्या चौकशीअंती आणि तांत्रिक पडताळणीनंतरच व्हेंटिलेटरच्या वापराबाबतचे नेमके वास्तव आणि सत्य समोर येणार आहे.



नव्या इमारतीतील अतिदक्षता विभाग (एसएनसीयू) सुरू करताना तिथल्या डॉक्टरांनी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी ‘शिल्लर’ कंपनीचे व्हेंटिलेटर वापरण्यास लेखी व तोंडी तीव्र विरोध केला होता. मात्र, डॉक्टरांचा हा विरोध पायदळी तुडवून अखेर वरिष्ठ पातळीवरून त्याच वादग्रस्त कंपनीची व्हेंटिलेटर वापरण्याची सक्ती का करण्यात आली? निष्पाप चिमुकल्यांच्या जिवापेक्षा आरोग्य विभागाचे या कंपनीशी नेमके काय गूढ नाते आहे, असा सवाल आता अमरावतीकर विचारत आहेत.

## नवजात शिशू कक्षातील आगीप्रकरणी

# खासदारांच्या राजीनाम्याची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ अमरावती –** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू कक्षात लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेने संताप व्यक्त होत आहे. या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर भीम ब्रिगेडचे अध्यक्ष राजेश आर. वानखडे यांनी खासदार बळवंत वानखडे यांच्या सह जिल्ह्याचे पालकमंत्री बावनकुळे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.



आरोग्य विभागाच्या अखत्यारितील रुग्णालयांचे नियमित निरीक्षण आणि आढावा बैठका घेण्यात प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचा आरोप राजेश वानखडे यांनी केला. रुग्णालयांमधील सुरक्षाव्यवस्थेचा नियमित आढावा घेतला गेला असता तर अशा दुर्घटना टाळता आल्या असत्या, असा दावा त्यांनी केला.रुग्णालयांमधील इलेक्ट्रॉनिक उपकरणांची नियमित तपासणी करावी, प्रत्येक रुग्णालयाचे फायर ऑडिट अनिवार्य करावे आणि त्यातील त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तसेच डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या ड्युटी व्यवस्थेवरही प्रशासनाने कठोर निगराणी ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.नवजात बालकांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी रुग्णालयांच्या सुरक्षा व्यवस्थेत तातडीने सुधारणा करण्याची गरज असल्याचे राजेश आर. वानखडे यांनी म्हटले आहे.

# चौकशी समितीचे अध्यक्ष गायब, रुग्णालय वाऱ्यावर!’

## आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्याविरोधात अमरावतीत तुफान घोषणाबाजी



विदर्भ प्रजासत्ताक **दि.२६ अमरावती**

अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील ३ चिमुकल्यांच्या मृत्यूनंतर आता संतापाचा उद्रेक झाला आहे! या भीषण दुर्घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी शासनाने आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षते खाली विशेष चौकशी समिती गठीत केली आहे. मात्र, चौकशी समितीचे अध्यक्ष असूनही आयुक्त संजय काटकर यांनी अद्याप जिल्हा स्त्री रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली नसल्याने त्यांच्याविरोधात रुग्णालयाच्या परिसरातच जोरदार निदर्शने आणि तुफान घोषणाबाजी सुरू झाली आहे! ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार गजानन लवटे यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी रुग्णालय परिसरात आक्रमक पवित्रा घेत आयुक्त संजय काटकर आणि प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला. एवढी मोठी भीषण दुर्घटना घडली, ३ निष्पाप बाळांचा बळी गेला आणि चौकशी समितीचे अध्यक्षच इथे फिरकायला तयार नाहीत! असा घणाघाती आरोप करत आमदार गजानन लवटे यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

# धुळघाटच्या मंडळ अधिकाऱ्यावर एसीबीचा ट्रॅप

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६मेळघाट–** मंडळ अधिकारी यांनी पकडलेला गिट्टीचा ट्रक कारवाई न करता सोडून देण्याच्या मागणीसाठी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना धारणी तालुक्यातील धुळघाट मंडळ अधिकारी गजानन अर्जुन कुमरे (वय ४१) यास एसीबी अमरावतीच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. बिल्डिंग मटेरियल सप्लायचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्याचा गिट्टीचा ट्रक धुळघाट येथील मंडळ अधिकारी (वर्ग तीन) याने २४ ऑगस्ट रोजी पकडला होता. कारवाई केल्यास शासकीय दंड अडीच लाच रुपये आहे व कारवाई न करण्यासाठी यातील अर्धे पैसे लाच म्हणून मागितले होते. व्यापाऱ्याने पैसे न देता लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांच्याकडे तक्रार दाखल केली. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने धारणी येथे मंगळवारी (ता. २५) सापळा रचून ४० हजार लाचेची मागणी केल्यानंतर ३० हजार रुपयांवर सेटलमेंट झाले. ते लाचेचे ३० हजार रुपये स्वीकारताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे मंडळ अधिकारी गजानन अर्जुन कुमरे (वय ४१) यास अटक करून त्याच्याविरुद्ध धारणी ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू केली होती. पोलिस निरीक्षक संजय शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. या पथकात पोलिस निरीक्षक चित्रा मेसरे, सुधीर चर्जन, वैभव जायले, उपनिरीक्षक सतीश किटकुले आदींचा सहभाग होता.

# अमरावती मनपातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या PF-ESIC निधीचा घोळ?

## वडेट्टीवारांकडे चौकशीची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** अमरावती महानगर पालिकेतील मनुष्यबळ पुरवठा व स्वच्छता ठेक्यांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या झक्र व एडखउ निधीबाबत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मागील पाच वर्षांपासून यासंदर्भात तक्रारी करण्यात येत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे करण्यात आली आहे.या प्रकरणासंदर्भात एझक्रऊ अमरावती व अकोला कार्यालय, मंत्रालय तसेच अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मनपा



प्रशासनाकडून यापूर्वी संबंधित मनुष्यबळ पुरवठा संस्थांवर मोठ्या रकमेचा दंड आकारण्यात आल्याची माहितीही तक्रारदाराने दिली आहे.विशेष म्हणजे, तत्कालीन आयुक्तांच्या कार्यकाळातील या कारवाईशी संबंधित महत्त्वाची फाईल सध्या महानगरपालिका कार्यालयातून गहाळ असल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. फाईल प्रत्यक्षात गहाळ झाली असल्यास, हा गंभीर प्रशासकीय प्रकार असून फाईलच्या जबाबदारीवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, झक्र व एडखउ संदर्भातील चलन, एउठ, वेतनपत्रके, बँक व्यवहार, संबंधित ठेकेदारांना करण्यात आलेली देयके तसेच इतर वैधानिक कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात झालेली रक्कम संबंधित खात्यांमध्ये वेळेत जमा झाली की नाही, याची स्वतंत्र चौकशी करण्याचेही निवेदनात म्हटले आहे.फाईल गहाळ झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनासह शिस्तभंगाची आणि आवश्यकतेनुसार फौजदारी कारवाई करावी. तसेच झक्र व एडखउ नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारांकडून कामगारांची तसेच महानगरपालिकेची थकीत रक्कम वसूल करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.नवनियुक्त महानगरपालिका आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन स्वतंत्र व निष्पक्ष चौकशीचे आदेश द्यावेत आणि चौकशी निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून अहवाल उपलब्ध करून द्यावा, यासाठी वडेट्टीवारांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# ३ परिचारिका अन् एका ब्रदरचा भाजपकडून प्रत्येकी ५० हजारांची मदत देऊन सन्मान

## दुःखाच्या प्रसंगी सामाजिक उत्तरदायित्वातून मृतांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ अमरावती :** एकीकडे आगीच्या भीषण ज्वाला आणि दुसरीकडे निष्पाप चिमुकल्यांचा आक्रोश... अशा काळजाचा ठोका चुकवणाऱ्या मृत्यूच्या तांडवात स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता ३६ बालकांना सुरक्षित बाहेर काढणाऱ्या अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील ३ परिचारिका आणि एका ब्रदरच्या धाडसाचा बुधवारी (ता.२६) अश्रूंच्या आणि कौतुकांच्या वर्षावात सन्मान करण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने या ’रिअल लाईफ हिरोंना’ प्रत्येकी ५० हजार रुपयांची रोख रक्कम देऊन त्यांच्या असीम धैर्याची दखल घेण्यात आली.

ज्या वेळी रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावरील अतिदक्षता विभागात सर्वत्र धुराचे लोट पसरले होते, त्यावेळी आपल्या जीवाची बाजी लावून या कर्मचाऱ्यांनी आगीत धाव घेतली आणि त्या



चिमुकल्याना काळजाशी कवटाळून बाहेर काढले. त्यांच्या या अविश्वसनीय शौर्याची आणि माणुसकीची दखल घेत भाजपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अत्यंत भावूक वातावरणात या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. रुग्णालयातील या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर भाजपची शहरातील ऐतिहासिक दहीहंडी रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही यावेळी जाहीर करण्यात आला.या सन्मान सोहळ्याला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे पाटील, आमदार प्रवीण तायडे, महापौर श्रीचंद तेजवानी, भाजप नेत्या निवेदिता चौधरी, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर, तुषार भारतीय, चेतन गावंडे, चेतन पवार, आरती वानखडे, छायाताई दंडाळे, महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक आघाडीचे महामंत्री सलीम घाणीवाले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भयंकर घटनेत परिचारिका आणि ब्रदर्स यांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्वा चा परिचय देत अतुलनीय धाडसाचे काम केले. त्यांच्या या शौर्याचा आणि समर्पणाचा सन्मान होणे अतिशय आवश्यक होते. त्यासाठी भाजपने पूर्ण क्षमतेने त्यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आहे.जखमी झालेल्या मुलांना व त्यांच्या नातेवाईकांनाही आम्ही पूर्ण मदत करणार आहोत.

> या दुःखाच्या प्रसंगी सामाजिक उत्तरदायित्व पूर्ण करणे आमचे कर्तव्य आहे. चिमुकल्या बालगोपालांचा मृत्यू होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. म्हणूनच आम्ही यावर्षीची दहीहंडी रद्द करून मृत बालकांचे कुटुंबीय आणि जखमींच्या नातेवाईकांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण भाजप परिवार या दुःखाच्या प्रसंगात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे **–प्रवीण पोटे पाटील (आमदार)**


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :